नियमी फौजदारी खटला क्र. ७२/२०१८
शासन / मिलिंद
नि. क्रं. ३९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०५ शपथेवर निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नांव | :– | गुंडू व्यंकट साळुंके, |
| वय | :– | ४८ वर्ष, |
| व्यवसाय | :– | शेती, |
| राहणार | :– | धानुरी, ता. लोहारा, जि. धाराशिव. |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्री. एस.व्ही.काळे यांच्यामार्फत**

**१.** माझया गावातील संभाजी मुसांडे यांना मी ओळखतो. सन २०१८ मध्ये मी, संभाजी मुसांडे, अजित मुसांडे असे आम्ही महावितरण कार्यालय लोहारा येथे वीज अखंडीत पुरवठा होत नसल्याबाबत आलो होतो. याबाबत आम्ही महावितरण कार्यालयामध्ये उपस्थीत असलेले जठार यांना विचारणा केली. जठार यांनी संभाजी मुसांडे याला पूर्वीचा असलेला गुन्हा मघारी घे असे म्हणले. जठार यांनी संभाजी मुसांडे यांना लोखंडी रॉडने मारहाण करत असताना त्यांनी हात आडवा लावल्याने त्यांच्या हाताला मार लागला. त्याठिकाणी इतर कर्मचारी आले. आलेल्या कर्मचा-यानी मारहाण करण्यास सुरूवात केली. संभाजी याला लोहारा येथील शासकीय रूग्णालयात उचाराकरिता दाखल केले. आरोपी हे न्यायालयात हजर आहेत त्यांना मी ओळखतो. ज्या लोखंडी रॉडने मारहाण झाली तो पाहिल्यास मी ओखळु शकतो. आता मला लोखंडी रॉड दाखवण्यात आला तो वस्तु क्रं. **'अ'** कडे असुन तोच आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. श्री. एम.व्ही. साठे यांच्या मार्फत**

**२.** मी शेतामध्ये सकाळी ०६.०० वाजता जावुन ०९.०० वाजता परत येतो. तसेच मी दुपारी शेतात गेल्यानंतर सायंकाळी ०५.०० ते ०६.०० वाजण्याच्या दरम्यान परत येतो. हे म्हणणे खरे नाही की, संभाजी मुसांडे हा माझा पाहुणा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझया गावात लाईनमन आहे. त्याच्या हाताखाली दोन मदतगार असल्याबाबत मला माहित नाही.हे म्हणणे खरे आहे की, गावातील वीज पुरवठयाची देखभाल करणे हे लाईनमनची काम आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातील बेकायदेशीर जोडणी तसेच डिपी बंद असल्यास त्याची पाहणी करून दुरूस्ती करणे हे देखील लाईनमनचे काम आहे. हे म्हणणे खरे आहे की, विज पुरवठयाबाबत कांही तक्रारी असल्यास गावातील लोक लाईनमन कडे तक्रार करतात.

**प्रश्न :–** अशी काय तक्रार केली होती काय ?

**उत्तर :–** तोंडी तक्रार केली होती.

हे म्हणणे खरे आहे की, मी लेखी स्वरूपात तक्रार केलेली नव्हती. आम्ही गावातील तिघे–चौघे आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, लोहारा ते धानुरी अंतर १० ते १५ किलोमीटर ऐवढे आहे. आम्ही ०५.०० वाजण्याच्या सुमारास आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, एम.एस.बी.चे कार्यालय हे तालुक्यातील मुख्य कार्यालय असुन त्याठिकाणी ५–२५ लोकांचा स्टाफ आहे. हे

म्हणणे खरे आहे की, तालुक्यातील लाईनमन व इतर कमर्चारी या कार्यालयास विविध कामासाठी भेट देत असतात त्यामुळे त्याठिकाणी कायम वर्दळ असते.

**३.** संभाजी मसांडे हा त्यावेळेस राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचा तालुका अध्यक्ष होता याबाबत मला माहित नाही. तसेच तो पुढारी व राजकारणी असल्याबाबत मला माहित नाही. संभाजी मुसांडे याच्यावर ग्रामसेवकाला मारहाण करून शासकीय कामामध्ये अडथळा केल्याबाबत त्याच्यावर केस असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, संभाजी मुसांडे हा नेहमी कर्मचा–यावर दबाव टाकुन बेकायदेशीररित्या काम करून घेत होता. संभाजी मुसांडे याच्या ऐकटयाच्या शेतात डिपी बसवावा अशी त्याची मागणी होती याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, संभाजी मुसांडे याचे डिपी बसवण्याचे काम पूर्ण होत नसल्यामुळे तो एम.एस.बीच्या कर्मचा–यावर व अधिका–यावर चिडुन होता.

**४.** माझया म्हणण्या प्रमाणे तक्रार झाली त्यावेळे ५ ते ७ लोक जमा झाले होते. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. तो घटणा घडल्यानंतर साधारण एक महिन्याच्या कालावधी मध्ये घेतला होता. जठार यांच्यावर पूर्वीचा गुन्हा दाखल असलेला माघारी घेण्याबाबतचा मजकुर मी पोलिसांना सांगीतल्याचे मला आठवत नाही. कर्मचारी यांनी संभाजी मुसांडे याला मारहाण केल्याबाबतचा मजकुर मी पोलिसांना सांगीतलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अशा प्रकारची कोणतीच घटणा घडलेली नाही. संभाजी मुसांडे यांच्या सागण्यावरून खोटी साक्ष देत आहे. दिनांक २४.०५.२०१८ रोजी संभाजी मुसांडे यांने जठार यांना मारहाण करून शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केल्याबाबत त्याच्यावर केस दाखल होती याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, महावितरण ते पोलिस स्टेशन यामधील पाच मिनीटाचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसेच महावितरण ते सरकारी दवाखाना या मधीलही अंतर पाच मिनीटाचे आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

सही/-

दिनांक :- ०६/०४/२०२६

**( पी.एस.बनकर )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोहारा